## D.8 Efforts to Encourage Students to participate in National and International Competitions

### Name

**Sanket Rajendra Pawar**

### Award / Competition

**NEST by Novartis**

### Organizer

**Novartis**

### Event Details

NEST by Novartis was a national-level competitive program that witnessed **over 34,000+ registrations from across India**. The competition was conducted in **four rigorous rounds**, designed to assess participants on innovation, problem-solving ability, and industry-relevant skills.

### Achievement

- Secured **National Runner-Up** position
- Awarded a **cash prize of ₹75,000**
- Received **direct recognition from Novartis leadership**
- Earned a **Pre-Placement Interview (PPI) opportunity** with Novartis

### Prize Amount

**₹75,000**

### Outcome / Impact

This achievement demonstrated strong professional competence and innovation capabilities. The recognition from senior Novartis leaders and the Pre-Placement Interview opportunity significantly contributed to career advancement and industry exposure.

### Placement Organization

**Novartis Healthcare Private Limited**

ऐक्य

# अभियांत्रिकी महाविद्यालय, फलटणच्या संकेत पवारला हॅकेथॉन राष्ट्रीय स्पर्धेत उपविजेतेपद



▲ **फलटण** दि. २३ : फलटण एज्युकेशन सोसायटी संचलित अभियांत्रिकी महाविद्यालय, फलटण येथील बी. टेक. (कॅम्प्युटर अभियांत्रिकी) शाखेतील विद्यार्थी संकेत पवार हा राष्ट्रीय स्तरावरील NEST (Nurturing Excellence, Strengthening Talent) स्पर्धेत उपविजेता ठरला असून त्याने महाविद्यालय आणि संस्थेचे नाव उज्ज्वल केले आहे.

नोव्हार्टिस फार्मास्युटिकल कंपनीतर्फे आयोजित या स्पर्धेत त्याने उत्कृष्ट प्रदर्शन करत अंतिम फेरीत उल्लेखनीय स्थान मिळवले आणि ७५,००० चे पारितोषिक मिळवले. स्पर्धा संपूर्ण भारत भरातील विद्यार्थ्यांसाठी खुली होती. संकेतने पहिल्या ३ फेऱ्या यशस्वीपणे पार करत इंडियन इन्स्टिटट्यूट ऑफ सायन्स (IISc), बेंगळुरू आणि BITS स्कूल ऑफ मॅनेजमेंट, मुंबई यासारख्या प्रतिष्ठित संस्थांच्या विद्यार्थ्यांमध्ये आपले स्थान निर्माण केले होते. चौथ्या फेरीत त्याने या स्पर्धेचे उपविजेतेपद मिळवले. अथक परिश्रम व बुद्धिमत्तेच्या जोरावर त्याने अंतिम फेरीत दमदार कामगिरी करत उपविजेतेपद मिळवले. संकेतच्या या उल्लेखनीय यशाबद्दल फलटण एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष आ. श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर, नियामक मंडळाचे चेअरमन श्रीमंत रघुनाथराजे नाईक निंबाळकर, सेक्रेटरी श्रीमंत संजीवराजे नाईक निंबाळकर, प्रशासन अधिकारी प्राचार्य अरविंद निकम, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नरेंद्र नार्वे यांनी त्याचे अभिनंदन केले व उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

संकेत पवारच्या या अपूर्व यशाने संपूर्ण महाविद्यालय, प्राध्यापकवर्ग व विद्यार्थी परिवारामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्याच्या मेहनतीला मिळालेल्या या राष्ट्रीय स्तरावरील मान्यतेमुळे महाविद्यालयाच्या गौरवात भर पडली असून, त्याच्या भविष्यातील वाटचालीसाठी सर्वांकडून मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या जात आहेत!